# श्रीगुरूपदेश
# श्रीगुरूंचे उपदेश

## अमी बंसल यांच्याद्वारे लिखित भाष्य

आज, २९ जुलै, २०२६साठी 'श्रीगुरू-उपासना' या अंतर्गत शब्द आहे, श्रीगुरूपदेश—'श्रीगुरूंचे उपदेश.' गुरुपौर्णिमेच्या पावन दिवशी आपल्या चेतनेत प्रस्थापित करण्यासाठी यापेक्षा अचूक असा कोणता शब्द असू शकतो!

'उपदेश' या संस्कृत शब्दाचे दोन भाग आहेत. पहिला भाग आहे, 'उप' जो उपसर्ग आहे आणि तो दर्शवतो, एखाद्या व्यक्तीकडे वा गोष्टीकडे जाणे किंवा तिच्या समीप असणे. 'देश' या शब्दाचा मूळ धातू आहे 'दिश्', ज्याचा अर्थ आहे 'निदर्शनास आणणे किंवा संकेत करणे,' 'मार्गदर्शित करणे' किंवा 'दाखवणे.' 'उपदेश' हा संयुक्त शब्द अशी गोष्ट दर्शवतो, जी एखाद्या व्यक्तीला एखाद्या विशिष्ट गोष्टीकडे निर्देशित करते किंवा मार्गदर्शित करते. तेव्हा 'उपदेश' या शब्दाचे भाषांतर 'मार्गदर्शन,' 'शिकवण,' 'दिशानिर्देशन' किंवा 'सल्ला' असे करता येते.

भारताच्या शास्त्रग्रंथांमध्ये 'उपदेश' या शब्दाची व्याख्या विशेषतः श्रीगुरूंचे मार्गदर्शन अशी केली गेली आहे. हे ते मार्गदर्शन असते, जे विद्यार्थ्याने अर्थात् श्रीगुरूंच्या शिष्याने जर समजून घेतले आणि ते आत्मसात करून सक्रियपणे आचरणात आणले, तर ते शिष्याला भगवंताकडे, आत्मज्ञानाकडे घेऊन जाते.

भारतीय शास्त्रग्रंथांच्या परंपरेतील सर्वात प्रमुख उपदेशांमधील काही उपदेश उपनिषदांमध्ये आढळून येतात. त्यांमध्ये समाविष्ट आहेत 'महावाक्ये,' उदाहरणार्थ, 'तत्त्वमसि', म्हणजे 'तू ते आहेस.' 'उपनिषद'चा शब्दशः अर्थ आहे, 'समीप बसणे.' 'उपनिषद' आणि 'उपदेश' हे दोन शब्द एकत्रपणे पाहिल्यास मनात एक अतिशय सुंदर प्रतिमा उभी राहते.

श्रद्धा-भक्तीने व समर्पणभावाने, एका आत्मसाक्षात्कारी गुरूंच्या समीप बसून एक शिष्य उपदेश ग्रहण करतो—अर्थात शिष्य ते दिशानिर्देश आणि मार्गदर्शन ग्रहण करतो, जे त्याला आत्मज्ञानाकडे घेऊन जातात.

उपनिषद काळात, केवळ त्याच शिष्यांना श्रीगुरूंचे उपदेश प्राप्त होत असत, ज्यांना श्रीगुरूंचे मार्गदर्शन प्राप्त करण्याची खऱ्या अर्थाने तीव्र उत्कंठा असे आणि जे आत्मज्ञान प्राप्त करण्यास

इच्छुक असत. तेव्हा, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, ते उपदेश समजण्यासाठी मुळात शिष्याने सक्रियतेने त्यांच्यासह कार्यरत राहणे आवश्यक असते. शिष्याच्या अंतरी अध्ययन करण्याची व शिकण्याची प्रबळ इच्छा असायला हवी, जेणेकरून श्रीगुरूंच्या मार्गदर्शनाची पाळेमुळे त्याच्या अंतरी खोलवर रुजतील आणि ते मार्गदर्शन शिष्याला खरोखर त्याच्या उद्दिष्टाकडे घेऊन जाईल. शिष्यामध्ये श्रीगुरूंच्या उपदेशानुरूप, श्रीगुरूंच्या मार्गदर्शनानुरूप जीवन जगण्याची तीव्र उत्कंठादेखील असायला हवी. शिष्यामध्ये 'मुमुक्षुत्व' असायला हवे; 'मुमुक्षुत्व' म्हणजे भगवंताला जाणण्याची, मोक्षप्राप्तीची अदम्य, दृढ तळमळ.

उपदेश तेव्हाच प्रभावी व सार्थक ठरतो जेव्हा गुरू आणि शिष्य यांच्यामध्ये सामीप्य असते. म्हणून, एखादा शिष्य जेव्हा श्रीगुरूंच्या समीप येतो, तेव्हा त्याला श्रीगुरूंच्या उपदेशाच्या खऱ्या शक्तीचा अनुभव येतो. तुम्हाला प्रश्न पडू शकतो की, 'श्रीगुरूंच्या समीप येणे' याचा काय अर्थ आहे. कोणकोणत्या मार्गांनी शिष्य असे करू शकतो? खरे सांगायचे झाल्यास, असे करण्याचे अनेक मार्ग आहेत—उदाहरणार्थ, यांमध्ये समाविष्ट आहेत, श्रीगुरूंविषयी गहन आदर, समर्पणभाव व श्रद्धा-भक्ती यांचा विकास करणे, श्रीगुरूंची सेवा करण्याची उत्कंठा बाळगणे, श्रीगुरूंच्या शिकवणी लक्षपूर्वक ऐकणे आणि आपल्या वेळेचे नियोजन अशा प्रकारे करणे जेणेकरून अध्ययन व अभ्यास आपली प्राथमिकता बनेल.

प्राचीन काळी, श्रीगुरूंचे उपदेश प्राप्त करण्यासाठी शिष्यांना भौतिक रूपाने श्रीगुरूंच्या समीप राहणे आवश्यक असे. आजकाल, सिद्धयोग मार्गावर, तंत्रज्ञानाच्या मदतीने, आपण जिथे कुठे असू, अगदी तिथेच आपण आपल्या श्रीगुरूंचे उपदेश ग्रहण करू शकतो. भौतिक रूपात आपण कुठेही जरी असलो, तरीही आपल्यावर कोणतीही मर्यादा येत नाही. आपण जेव्हा सिद्धयोग मार्गाची वेबसाइट पाहतो, तेव्हा आपण अशी कल्पना करू शकतो की, आपण आपल्या श्रीगुरूंच्या चरणकमलांपाशी बसलेले आहोत आणि श्रीगुरूंच्या शिकवणी ग्रहण करण्यासाठी तत्पर व तयार आहोत. आणि या शिकवणी ग्रहण केल्यानंतर आपण त्यांना आपल्या बोधात धारण करावे, त्या शिकवणींच्या सातत्यपूर्ण अध्ययनाद्वारे, चिंतनमननाद्वारे तसेच त्यांचे परिपालन करण्याद्वारे आपण त्यांना आपल्या जीवनात साकार करावे.

***

भारतीय शास्त्रग्रंथांमध्ये 'उपदेश' या शब्दाचा आणखी एक अर्थ आढळून येतो, तो म्हणजे 'दीक्षा.' यावरून आपण हे समजू शकतो की, शब्द हे बरेचदा 'श्रीगुरूपदेशाचे' वाहक जरी असले, तरी त्याची शक्ती ही त्या शब्दांच्या पलीकडे असते. श्रीगुरूंचा उपदेश म्हणजे त्यांच्या रूपांतरणकारी शक्तीचे शिष्यामध्ये होणारे प्रत्यक्ष संप्रेषण असते. शिष्याने जर तो उपदेश, ते मार्गदर्शन आपल्या हृदयात

उतरवून त्याचा अंगीकार करण्याचा निश्चय केला, त्याने जर त्या उपदेशाचे अध्ययन करण्याचा व तो उपदेश स्वतःच्या आचरणात आणण्याचा दीर्घकाळापर्यंत प्रयत्न केला, तर ते रहस्यमय ज्ञान हळूहळू त्याला सर्व सीमिततांपासून मुक्त करते—दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, ते त्याला त्या सर्व गोष्टींपासून मुक्त करते, ज्यांच्यामुळे तो स्वतःला तुच्छ समजतो, जसे की, स्वतःच्या क्षमतांवर अविश्वास असणे, अयोग्यतेचा भाव आणि भीती. कृपाशक्तीने परिपूर्ण असलेले श्रीगुरूंचे उपदेश हे समस्त भ्रमयुक्त संकल्पना आणि मिथ्या तादात्म्य [म्हणजेच स्वतःविषयीची खोटी ओळख] यांच्या मुळावर थेट घाव घालतात.

आत्मा हे आपले सत्यस्वरूप आहे, या तथ्याविषयीचे आपले अज्ञान हे एका अशा चुकीच्या संकल्पनेमुळे निर्माण होते, जिची पाळेमुळे जन्मजन्मांतरांपासून आपल्या अंतरी खोलवर रुजलेली आहेत. केवळ सामान्य किंवा सांसारिक ज्ञान वा कार्ये हे अज्ञान नष्ट करू शकत नाहीत. याच कारणास्तव श्रीगुरूंचे उपदेश अनमोल आहेत आणि म्हणूनच शिष्याने त्यांचे महत्त्व जाणून ते अंगीकारणे अत्यावश्यक आहे.

एका शिष्याने याविषयी विचार करणे नेहमीच लाभदायक असते की, तो श्रीगुरूंचे उपदेश कशा प्रकारे ग्रहण करतो आहे. शिष्य स्वतःला विचारू शकतो : “श्रीगुरू जे सांगत आहेत, ते माझ्यासाठी आणि माझ्या जीवनासाठी समर्पक आहे असे समजून मी त्यांच्या शब्दांचा खऱ्या अर्थाने स्वीकार करतो आहे का? श्रीगुरू मला जे शिकवत आहेत, ते मला समजते आहे का? श्रीगुरू जे सांगत आहेत, ते मी संपूर्णपणे ऐकतो आहे का? अथवा मी एखाद्या विशिष्ट क्षणी मला जी गोष्ट प्रभावित करते, तेवढीच गोष्ट निवडून तिचाच स्वीकार करतो आहे? मी फक्त त्याच भागांवर लक्ष केंद्रित करतो आहे का, की जे आचरणात आणण्यासाठी मला सोपे वाटतात, किंवा मी त्या भागांवर लक्ष केंद्रित करतो आहे, जे मला एखाद्या विशिष्ट प्रसंगी माझ्यासाठी ‘आवश्यक’ वाटतात?”

सिद्धयोग मार्गावरील एक विद्यार्थी या नात्याने, आपण वेळोवेळी स्वतःला असे प्रश्न विचारले पाहिजेत आणि त्यांच्या उत्तरांबाबत आपण स्वतःशी प्रामाणिक राहिलेच पाहिजे. आपण आपल्या साधनेचे उत्तरदायित्व पूर्णपणे घ्यायला हवे. आपण जेव्हा श्रीगुरूंच्या उपदेशावर पूर्ण विश्वास ठेवतो आणि जेव्हा आपण पूर्ण निष्ठेने व परिश्रमपूर्वक त्या उपदेशावर कार्य करतो, तेव्हा तो उपदेश आपल्याला एक गहन आत्म-अन्वेषण करण्यास प्रवृत्त करतो. आणि जसजसे आपण दिवसानुदिवस हे अन्वेषण करत राहतो, तसतसे आपल्या अंतरी हळूहळू एक रूपांतरण होत असल्याचे आपल्या अनुभवास येऊ लागते.

बृहदारण्यकोपनिषदात सांगितले आहे की, ब्रह्म, म्हणजे सर्वात्मा ‘नेति-नेति’ आहे, अर्थात ‘हे नाही, हे नाही.’[१] मुद्दा हा आहे की, ज्या बाह्य उपाधींना आपण आत्म्याशी जोडू पाहतो त्यांच्या आधारे

आत्म्याची व्याख्या करता येऊ शकत नाही आणि म्हणूनच *आत्मानुभूती* सारखी दुसरी कुठली अनुभूतीच नाही. म्हणून, साधनेत श्रीगुरूपदेशरूपी मार्गदर्शनाचे अनुसरण करताकरता, आपण कोण आणि काय *नाही* आहोत याचे थर अखेरीस गळून पडतात आणि आपले खरे स्वरूप प्रकाशमान होऊ लागते.

श्रीगुरुमाईंचे उपदेश आपल्याला अनेकविध रूपांमध्ये प्राप्त होतात. श्रीगुरुमाईंच्या मौखिक आणि लिखित रूपांतील शिकवणींमध्ये त्यांचे उपदेश, त्यांचे मार्गदर्शन निहित आहे, त्यांच्या मौनामध्ये आणि इतकेच नव्हे तर त्यांच्या अगदी साध्याशा वाटणाऱ्या संभाषणांमध्ये आणि हावभावांमध्येदेखील त्यांचे उपदेश विद्यमान आहेत. आपल्याला ध्यानात, स्वप्नांत आणि निसर्गात श्रीगुरुमाईंचे जे अनुभव येतात, त्यांमध्येही त्यांचे उपदेश असू शकतात. श्रीगुरुमाईंचे विद्यार्थी या नात्याने आपले हे पावन उत्तरदायित्व आहे की, श्रीगुरुमाई ज्या-ज्या रूपांमध्ये आपल्याशी संवाद साधतात, त्या सर्व रूपांमधील त्यांचे उपदेश आपण ओळखावेत, ते समजून घ्यावेत आणि त्या उपदेशांचे अध्ययन करण्यासाठी, त्यांच्यासमवेत कार्यरत राहण्यासाठी तत्पर व तयार असावे.

अनेक वर्षांपूर्वी, ध्यानामध्ये मला दिसले होते की, मी गुरुदेव सिद्धपीठात सेवा करते आहे. मी ज्या खोलीत होते, त्या खोलीत श्रीगुरुमाई आल्या. मी आदराने उभी राहिले. त्यांच्या चहूबाजूला सोनेरी प्रकाशपुंज झगमगत होता. मग त्यांनी मला श्रीगुरूंच्या उपदेशाच्या, श्रीगुरूंच्या मार्गदर्शनाच्या स्वरूपाविषयी समजावले.

श्रीगुरुमाई म्हणाल्या, “श्रीगुरूंच्या उपदेशाचा, श्रीगुरूंच्या मार्गदर्शनाचा उदय भगवंताच्या प्रकाशातून होतो. जेव्हा एखादी व्यक्ती खरोखर ते मार्गदर्शन आत्मसात करते, तेव्हा ते मार्गदर्शन पुन्हा एकदा भगवंताच्या प्रकाशात परिवर्तित होते. अशा प्रकारे, श्रीगुरूंचे मार्गदर्शन साधकाला दिव्य प्रकाशाची अनुभूती करवते.”

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

[१] बृहदारण्यकोपनिषद, २.३.६.